**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.०९/०३/२०१९**
**दि.०८/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे २००/१९,भादविक ३६५,३२४,१४३,१४६,१४७,५०४,५०६(२) |
| **फिर्यादी** | मुकूल ताम्हाणे, वय २५ वर्षे,रा.बाणेर गाव,पुणे |
| **आरोपी** | कृष्णा साळवी, रा.औंध,पुणे व इतर ९ ते १० साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०३/२०१९ रोजी ०६/०० वा.चे सुमारास पोपॉय जीम, सत्वंम हॉटेलचे बाजुस, चाकणकर मळा,बाणेर,पुणे |
| **तपशिल** | दि.०५/०३/२०१९ रोजी दिनेश चाकणकर व यातील नमुद इसम कृष्णा साळवी यांचेमध्ये गाडी ओव्हर टेक केल्याने झालेले भांडणाचे कारणावरुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी दुचाकी गाडयांवर काठयासह येवुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, धक्काबुक्की करुन, जबरदस्तीने त्यांचेसोबत बुलेट गाडीवर बसवुन आंबेडकर वसाहत, औंध पुणे येथे घेवुन जात असताना, त्यांनी फिर्यादी यांना दिनेश चाकणकर यास फोन करुन बोलविण्यास सांगितल्याने फिर्यादी यांनी त्यास वेळोवेळी फोन करुन बोलविले होते. तसेच त्यांनी फिर्यादी यांना आंबेडकर वसाहत, औंध पुणे येथे आणुन शिवीगाळ करुन,हाताने मारहाण करुन, व पाठीमागुन दिशेन चाकणकर हा आंबेडकर वसाहत, औंध,पुणे येथे आला असता त्याला यातील नमुद इसमांनी शिवीगाळ करुन, काठ्यांनी मारहाण करुन, त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.एस.शिंदे ७२७६१००१०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ५३/१९,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१,५०६ |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय २६ वर्षे,रा.सेनापती बापट,पुणे |
| **आरोपी** | विजयेंद्र गौतम गायकवाड,वय २८ वर्षे,रा.लक्ष्मी कुंज को ऑप. हौसिंग सोसायटी, बी.टी. कवडे रोड घोरपडी गांव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१२/२०१८ रोजी नानापेठ पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे नावावर दि.०३/१२/२०१८ रोजी फिर्यादी यांच्या खोट्या सह्या करुन, बनावट कागदपत्रे तयार करुन, त्याव्दारे एचडीएफसी बँक नाना पेठ, शाखा,पुणे येथे फिर्यादी यांचे नावे बनावट सेव्हिंग अकाऊंट उघडुन त्यातुन पर्सनल ४ लाख १० हजार रुपये लोन घेवुन तसेच एचडीएफसी चे क्रेडिट कार्ड वरुन १ लाख १० हजार रुपये क्रेडीट कार्डवरुन खरेदी करुन, फिर्यादी यांची एकुण ५ लाख २० हजार रु.ची आर्थिक फसवणुक करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेळके ९८८११९२००८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ४९/१९,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | एक इसम, वय ६५ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/११/२०१८ रोजी दुपारी ०२/०० वा.ते दु.०३/०८ वा.चे सुमारास फोनवरुन संपर्क साधुन शिवाजीनगरवरुन घरी कोथरुड जात असताना रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कामावर असताना, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, अज्ञात मोबाईल धारकांनी फिर्यादी यांच्या मोबाईलवर संपर्क साधुन, फिर्यादी यांना बँकेतून बोलत आहे असे सांगून,स्वतःचे फायद्यासाठी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांची एकूण रक्कम रूपये २२,५९९/- रूपये. मोबाईल वॉलेट प्रा.लि. व युडीआय ओमर्चट अकाऊंटवर |

ऑनलाईल पैसे वळवून फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली आहे.

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. व्ही.एम.आडकुर ९७६५५४२७३३

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे १५४/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड)

**फिर्यादी** एक महिला, वय ३९ वर्षे,रा.येरवडा,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०३/१०/२०१८ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** दिनांक ३०/०९/२०१८ रोजी फिर्यादी यांचे चुलत दिर हे आजारी असल्याने बुधराणी हॉस्पिटल येथे उपचार कामी ॲडमिट असल्याने, फिर्यादी यांनी त्यांचे पती यांना त्यांचे एटीमए कार्ड दिले व गोपनिय पिन नंबर त्यांना सांगितला होता.फिर्यादी यांचे पतींनी ते एटीएम कार्ड त्यांचा चुलत भाऊ यांना देवून ५,०००/- रुपये काढून हॉस्पिटल मध्ये भरले होते. त्यानंतर एटीएम कार्ड फिर्यादी यांचेकडेच होते. त्यानंतर दिनांक ०३/१०/२०१८ रोजी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे परस्पर फिर्यादी यांच्या बॅंक मधील खाते मधून ६३,०००/- रुपये एटीएम व्दारे रक्कम काढून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.(सदरचा गुन्हा अर्जावरुन दाखल आहे.)

**त.अंमलदार** पो.निरी. (गुन्हे ) वाघमारे ९८२३८११६९६

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे २१९/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक पुरुष,वय ४६ वर्षे,रा.हांडेवाडी,पुणे

**आरोपी** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/११/२०१८ रोजी १७/०० ते १८/१३ वा.चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** वर नमुद केले तारीख वेळ ठिकाणी, यातील फिर्यादी यांना अज्ञात व्यक्तीने फोन करुन बॅंकेतुन बोलत असल्याचे भासवुन, फिर्यादी यांचे बॅंकेच्या डेबीट कार्ड गोपनीय अवैधरीत्या माहिती मिळवून ऑनलाईन माध्यमाव्दारे ट्रान्झेक्शन करून, एकुण ९९,८००/- रु. रक्कमेची ऑनलाइन ट्रान्झेक्शन करून, फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** व.पो.निरी. अनिल पाटील ९९२३७८६९९९

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६







जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर